
गाववाला दि. 12.11.25

## अर्धापूर पोलिसांची धाडसी कारवाई

# कत्तलीच्या उद्देशाने कंटेनरमध्ये कोंबलेले ५२ रेडे कंटेनर पोलीसांनी पकडले; ४५ लाखांचा मुद्देमाल जप्त, तीन जणांना घेतले ताब्यात



अर्धापूर/गुणवंत विरकर

अर्धापूर पोलीस सोमवारी रात्री पेट्रोलिंग करत असताना पार्डी (मक्ता) ता. अर्धापूर टोलनाक्याजवळ कत्तलीसाठी जाणारा रेड्यांनी भरलेला कंटेनर पोलीसांनी धाडसी कारवाई करीत पकडला आहे.तीन जणांना ताब्यात घेत ४५ लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

नांदेड जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या आदेशानुसार अर्धापूर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली अर्धापूर पोलिसांनी धाडसी कारवाई करत कत्तलीच्या उद्देशाने रेड्यांना घेऊन जाणारा कंटेनर पकडला. त्या कंटेनर मध्ये निर्दयपणे कोंबलेले ५२ रेडे , कंटेनर चालक व अन्य दोन जणांना पोलिसांनी पकडले आहे. ५२ रेडे पंधरा लाख रूपयांचे व दहा टायरी कंटेनर तीस लाख रूपयांचे असा एकूण ४५ लाख रूपयांचा मुद्देमाल पकडला आहे.

अर्धापूर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर भाऊराव सुर्यवंशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी १) इरशात पि. इसाक वय ३३ वर्ष व्यवसाय चालक रा बिचोंदय मोहल्ला घसेरा जि. नुहू मेवाद राज्य हरियाना २) सुफियान पि.जान मोहम्मद वय २६ वर्ष व्यवसाय मजुरी रा. घोशीयान जि. बागपत राज्य उत्तरप्रदेश ३) हन्नी पि.जान महम्मद वय २५ वर्ष रा. घंग मोहल्ला होली चौक घसेरा मेवात राज्य हरियाना यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस जमादार रूपेश कुमार नरवाडे हे करीत आहेत. ही धाडसी कारवाई पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णूकांत क-हाळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक चित्तरंजन ठेमकेवाड, पोलीस उपनिरीक्षक परमेश्वर सुर्यवंशी, पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले, पोलीस जमादार प्रदिप जमदाडे, संभाजी गौरकर, भिमराव राठोड, रूपेशकुमार नरवाडे, शिलराज ढवळे, महेंद्र डांगे, विजय कदम, महिला इंदू गवळी यांनी केली आहे.